# प्रादेशिक योजनाविषयक नियम

# महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना (प्रादेशिक नियोजन मंडळ) नियम, १९६७

शासकीय अधिसूचना, नगर विकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक टीपीए-११६६/७८७६९-प्रमाणीकरण-दोन, दिनांक २९ डिसेंबर १९६७ (महाराष्ट्र राजपत्र, १९६८, भाग चार-ब, पृष्ठ १०).

पुढील अधिसूचनांद्वारे सुधारित—

शासकीय अधिसूचना, नगर विकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक टीपीए-११६८/६२८९-डब्ल्यु, दिनांक १० जुलै १९६९ (महाराष्ट्र राजपत्र, भाग एक, मध्य विभाग, पृष्ठ ६२२).

शासकीय अधिसूचना, नगर विकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक टीपीए-११७१-डब्ल्यु-दोन, दिनांक १ जून १९७३.

शासकीय अधिसूचना, नगर विकास व आरोग्य विभाग, क्रमांक टीपीआर-१०७५/१६९-युडी-७, दिनांक ३० मार्च १९७७.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) याच्या कलम १५८, पोट-कलम (२), खंड (एक), (दोन), (तीन), (चार), (पाच), (सहा), (सात), (आठ), (नऊ) आणि (सदतीस) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील नियम करीत आहे; हे नियम उक्त कलम १५८, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

## नियम

१. संक्षिप्त नाव.—या नियमांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना (प्रादेशिक नियोजन मंडळ) नियम, १९६७ असे म्हणता येईल.

२. मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती.—(१) या नियमात ,अन्यथा तरतूद करण्यात
आली असेल ते खेरीजकरून, प्रादेशिक मंडळाचे सदस्य, कलम ४, पोट-कलम (१) अन्वये प्रादेशिक नियो-
जन मंडळाची रचना करणाऱ्या अधिसूचनेची तारीख [1][किंवा कलम ३, पोट-कलम (२) अन्वयेच्या
अधिसूचनेद्वारे प्रदेशाच्या सीमांमध्ये फेरफार करण्यात आले असतील अशा बाबतीत, अशी अधिसूचना
शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्याची तारीख यांपैकी जी नंतरची असेल त्या तारखेपासून] दोन
वर्षांच्या कालावधीपर्यंत पद धारण करतील :

[2][परंतु, राज्य शासनास, मंडळाच्या विनंतीवरून, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, उप-
निर्दिष्ट सदस्यांच्या पदाची मुदत, एकाच वेळी पुढील एक वर्षापेक्षा अधिक नसणाऱ्या परंतु कोणत्याही
प्रकरणी एकूण ~~दोन~~ वर्षांहून अधिक होणार नाही इतक्या कालावधीपर्यंत वाढविता येईल :]

~~तीन~~ चार

परंतु आणखी असे की, स्थानिक प्राधिकरणांच्या सदस्यांमधून नेमण्यात आला असेल असा सदस्य, जर तो संबंधित स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य असल्याचे बंद होईल तर, प्रादेशिक मंडळाचा सदस्य असल्याचे चालू राहणार नाही.

(२) (नगर रचना अधिकाऱ्याव्यतिरिक्त) एखादा सदस्य मंडळाच्या नोकरीत तो असेल तोपर्यंत, प्रादेशिक मंडळाचा सदस्य म्हणून नियुक्त होण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.

---

[1] दिनांक ३० मार्च १९७७ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दिनांक १० जुलै १९६९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये दाखल करण्यात आला.

टिपीएस १९९८/४३/प्र.क्र.२४/९८/नवि-१२ [illegible]

(३) एखादा सदस्य जर—

(एक) सक्षम न्यायालयाने त्यास विकल मनाचा म्हणून जाहीर केले असेल; किंवा

(दोन) नादार म्हणून न्यायनिर्णीत झाला असेल, किंवा

(तीन) भारतातील कोणत्याही न्यायालयाने त्यास कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरवून दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीकरिता कैदेची शिक्षा दिली असेल ; किंवा

(चार) मंडळाच्या लेखी परवानगीशिवाय मंडळाच्या लागोपाठच्या तीन सभांना किंवा लागोपाठच्या सहा महिन्यामध्ये मंडळाच्या सर्व सभांना तो अनुपस्थित राहिला असेल, तर प्रादेशिक मंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(४) नगर रचना संचालक किंवा त्याने नामनिर्देशित केलेली एखादी व्यक्ती आणि नगर रचना अधिकारी याखेरीज, मंडळापुढील कोणत्याही प्रस्तावात ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असेल किंवा मंडळाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबतीत मुख्य व्यक्ती किंवा इतर व्यक्ती यांच्यावतीने व्यावसायिक हितसंबंध असेल किंवा त्यावेळी तो मंडळाच्या विरुद्धच्या कोणत्याही कामकाजात गुंतला असेल असा सदस्य, शक्य तितक्या लवकर, त्याच्या हितसंबंधाचे स्वरुप मंडळास स्पष्ट करील आणि असे निवेदन मंडळाच्या कार्यवृत्तात नमूद करण्यात येईल. माहिती मिळण्यासाठी इतर सदस्यांना त्याची उपस्थिती आवश्यक असेल त्याशिवाय, उक्त सदस्य असा प्रस्ताव चर्चिला जाईल अशा कोणत्याही सभेस उपस्थित राहणार नाही, पण अशा रीतीने उपस्थित राहणे आवश्यक असलेला कोणताही सदस्य, अशा कोणत्याही प्रस्तावावर मतदान करणार नाही :

परंतु असे की अशा प्रस्तावातील संबंधित कंपनीचा असा सदस्य शेअर-धारक आहे याच केवळ कारणावरुन वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे तो संबंधित आहे किंवा त्याचा हितसंबंध आहे असे समजण्यात येणार नाही.

३. शक्तींचा वापर करण्याची व कर्तव्ये पार पाडण्याची रीत.—नियम ५, ६, व ८ मध्ये विहित केलेल्या रीतीनुसार मंडळ कलम ८ खालील आपल्या शक्तींचा वापर करील व आपली कर्तव्ये पार पाडील.

४. प्रादेशिक नियोजन समितीच्या सदस्यांना देय असलेले भत्ते.—प्रादेशिक नियोजन समितीच्या सदस्यांना खालील दरांनी प्रवास व दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल :—

(एक) नगर रचना अधिकारी व शासकीय कर्मचारी असलेला कोणताही सदस्य यास मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ अन्वये त्याच्या श्रेणीनुसार कार्यालयीन कर्तव्यासाठी ज्या प्रवास व दैनिक भत्त्याची मागणी करण्याचा हक्क असेल तेवढा प्रवास व दैनिक भत्ता घेता येईल ;

(दोन) कोणताही अशासकीय सदस्य, मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ याचे परिशिष्ट ४२-अ याचे कलम १ मधील नियम १ (१) (ब) नुसार प्रवास व दैनिक [1][भत्ते] घेईल.

५. प्रदेशाची सर्वेक्षण आणि प्रादेशिक योजना तयार करणे.—(१) प्रादेशिक योजनेचा मसुदा तयार करण्यापूर्वी मंडळाकडून केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणात त्या प्रदेशात आढळून येणाऱ्या प्रमुख सोयी व साधनसामग्री यांच्या भौगोलिक, लोकसंख्याशास्त्र विषयक व आकडेवारीविषयक बाजू अंतर्भूत करण्यात येईल. अशा प्रादेशिक सर्वेक्षणांची पुढील गोष्टींशी संबंधित असणाऱ्या तीन व्यापक वर्गात विभागणी करता येईल :—

(एक) भौतिक वैशिष्ट्ये ;

(दोन) आर्थिक वैशिष्ट्ये ; आणि

(तीन) सामाजिक वैशिष्ट्ये.

---

[1] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दिनांक १० जुलै १९६९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये समाविष्ट करण्यात आला.

(२) प्रदेशाचे सर्वेक्षण करण्यापूर्वी आणि विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्यापूर्वी, मंडळ, कलम १३७ मध्ये विहित करण्यात आलेल्या रीतीने सार्वजनिक नोटीस देईल. त्या नोटीशीद्वारे लोकांना तसेच प्रदेशातील स्थानिक प्राधिकरणांना, केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांना व इतर संस्थांना, असे सर्वेक्षण व जमीन वापर नकाशा तयार करण्याच्या आपल्या हेतूची मंडळ माहिती देईल आणि त्या सर्वांना त्यासंबंधात आवश्यक वाटेल अशी सर्व संबंधित माहिती मंडळाच्या कर्मचाऱ्यांना देऊन आवश्यक ते सर्व सहाय्य करण्याची विनंती करील. प्रदेशाच्या सीमा दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत, मंडळाच्या मुख्य कार्यालयात तसेच प्रदेशातील जिल्हाधिकाऱ्याच्या व तहसिलदाराच्या आणि स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यालयात सार्वजनिक तपासणीसाठी उपलब्ध असेल असेही नोटीशीत नमूद करण्यात येईल.

(३) मंडळ प्रदेशाचे सर्वेक्षण करील व विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करील आणि मंडळाची रचना झाल्याची तारीख [1][किंवा कलम ३, पोट-कलम (२) अन्वयेच्या अधिसूचनेद्वारे प्रदेशाच्या सीमांमध्ये फेरफार करण्यात आले असतील अशा बाबतीत, अशी अधिसूचना शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्याची तारीख यांपैकी जी नंतरची असेल त्या तारखेपासून] बारा महिन्यांच्या आत, अशा रीतीने केलेल्या सर्वेक्षणाचे प्रतिवृत्त तयार करील आणि आणखी बारा महिन्यांच्या मुदतीत, प्रादेशिक योजनेचा मसुदा मंडळाकडून तयार करण्यात व प्रसिद्ध करण्यात येईल :

परंतु, राज्य शासनास, मंडळाच्या विनंतीवरुन, लेखी नमूद करावयाच्या कारणासाठी, अशी मुदत, एका वेळी सहा महिन्यापेक्षा जास्त असणार नाही [1][परंतु कोणत्याही बाबतीत, एकूण बारा (तीस) महिन्यातून जास्त असणार नाही] अशा, त्यास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत वाढविता येईल. दि ९।८।१९९८

(४) सर्वेक्षणाच्या प्रतिवृत्तात, प्रादेशिक मंडळाच्या मते ज्या महत्वाच्या असतील अशा, सर्वेक्षणामधून उद्भवणाऱ्या बाबींचे लेखी मूल्यमापन आणि प्रदेशापुढील विविध समस्या या गोष्टी असतील. उक्त प्रतिवृत्त व विद्यमान जमीन वापर नकाशा यासोबत, आवश्यक ते अहवाल, नकाशे, तक्ते, दस्तऐवज व प्रादेशिक योजनेत समाविष्ट करावयाचे प्रस्ताव तयार करण्यासाठी आवश्यक त्या आधारसामग्रीची ज्यामुळे तरतूद होईल अशी इतर माहिती देण्यात येईल.

(५) सर्वेक्षणाच्या संबंधात तयार करण्यात आलेले सर्व आराखडे व नकाशे आणि विद्यमान जमीन वापर नकाशा या गोष्टी, पंचवीस किलोमीटरांना दहा सेंटिमीटर यापेक्षा कमी असणार नाही अशा प्रमाणात काढण्यात येईल.

६. प्रादेशिक योजनेचा नमुना आणि ती प्रसिद्ध करण्याची रीत.—(१) प्रादेशिक योजना, दर्शक नकाशा आणि आवश्यक असे इतर नकाशे व दस्तऐवज याच्या पुरवणीसहीतचे लेखी विवरण या गोष्टी मिळून होईल.

(२) दर्शक नकाशा, पन्नास किलोमीटरांना दहा सेंटीमीटर यापेक्षा कमी प्रमाणाचा असणार नाही. दर्शक नकाशात, निरनिराळ्या प्रस्तावांतील ठिकाणांची क्षेत्रे किंवा त्यांच्या जागा आणि कलम १४ मध्ये निर्दिष्ट केलेला, प्रदेशाशी संबद्ध असणारा इतर तपशील देण्यात येईल.

(३) इतर नकाशे व दस्तऐवज यामध्ये, प्रादेशिक योजनेचे प्रस्ताव आणखी स्पष्ट व विस्तृतपणे दर्शविण्यात येतील आणि नकाशे पंचवीस किलोमीटरांना दहा सेंटीमीटर यापेक्षा कमी प्रमाणाचे असणार नाहीत.

(४) दर्शक नकाशात व इतर नकाशात दर्शविण्यात आलेले प्रादेशिक योजनेच्या मुख्य प्रस्तावाचे आणि प्रादेशिक योजना कार्यान्वित करण्यासाठीच्या विकास कार्यक्रमाच्या टप्प्यांचे संक्षिप्त वर्णन लेखी विवरणात [2][देण्यात येईल].

(५) राज्य शासनाने मान्यता दिलेली प्रादेशिक योजना मंडळाच्या प्रमुख कार्यालयात तसेच कलम १७ खालील नोटिशीत राज्य शासनाकडून निर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रदेशातील एका किंवा अधिक प्राधिकरणांच्या कार्यालयात पहाण्यासाठी मंडळाकडून उपलब्ध करण्यात येईल.

---

[1] दिनांक ३० मार्च १९७७ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दिनांक १० जुलै १९६९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये दाखल करण्यात आला.

कलम ५(३) Proviso - १२ महिने ऐवजी १८ महिने
९।८।१९९८ - १८ महिने ऐवजी ३० महिने

(x) 'परंतु राज्य शासनास त्याची नमूद करावयाच्या पुरेशा कारणास्तव ही मुदत एकावेळी २४ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. परंतु कोणत्याही प्रकरणी एकूण साठ महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही, इतक्या मुदतीपर्यंत वाढविता येईल.'

७. राज्य शासनाने प्रादेशिक योजनेस मान्यता देण्याची मुदत.—कलम १५ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाला ज्या मुदतीत प्रादेशिक योजनेस मान्यता देता येईल किंवा ती नाकारता येईल ती मुदत, राज्य शासनाला उक्त योजना मिळाल्याच्या तारखेपासून '[छत्तीस] साठ महिन्यांची असेल :

(x) ३) "परंतु आवश्यकतेनुसार राज्य शासन, हा अवधी संपला असो अथवा नसो, वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्रादेशिक योजनेस शासनाची मान्यता देण्याचा हा अवधी अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या पुढील अवधीने वाढवेल".

८. प्रादेशिक योजनेचा मसुदा प्रसिद्ध करण्याच्या नोटिशीचा नमुना व तो प्रसिद्ध करण्याची रीत.—प्रादेशिक योजनेचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आल्यावर कोणत्याही व्यक्तीकडून हरकती व सूचना मागविणारी नोटीस ही नमुना 'अ' मध्ये असेल. अशी नोटीस, शासकीय राजपत्रात आणि लागोपाठच्या दोन आठवड्यातील प्रत्येक आठवड्यात, प्रदेशातील, किमान एका स्थानिक वृत्तपत्रात, तसेच कलम १३७ मध्ये दर्शविलेल्या इतर रीतीने, प्रसिद्ध करण्यात येईल.

९. प्रादेशिक योजनेस किंवा प्रादेशिक योजनेचे पुनरीक्षण करण्यास राज्य शासनाकडून मान्यता देण्यात आल्याबद्दलची नोटीस.—प्रादेशिक योजनेला किंवा प्रादेशिक योजनेच्या पुनरीक्षणाला राज्य शासनाकडून मान्यता देण्यात येईल त्याबाबतीत आवश्यक ती नोटीस शासकीय राजपत्रात आणि प्रदेशातील एक किंवा अधिक वृत्तपत्रातून आणि तसेच, कलम १३७ मध्ये नमूद केलेल्या इतर रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल.

१०. प्रादेशिक योजनासंबंधातील दस्तऐवज इत्यादी उपलब्ध होणे.—मंजूर करण्यात आलेल्या योजनेसंबंधीचे दस्तऐवज, आराखडे, नकाशे आणि इतर कागदपत्र लोकांना पहाण्यासाठी म्हणून मंडळाच्या प्रमुख कार्यालयात आणि कलम १६० अन्वये मंडळ विसर्जित करण्यात आले असेल त्याबाबतीत प्रदेशातील राज्य नगर रचना आणि मूल्य निर्धारण विभागाच्या सर्वात जवळच्या कार्यालयात, कार्यालयीन वेळात, कोणत्याही वेळी खुले ठेवण्यात येतील.

४ (xx) [नमुना 'अ'

(नियम ८)

## प्रादेशिक योजनेचा मसुदा प्रसिद्ध करण्यासंबंधीच्या नोटिशीचा नमुना

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६

(सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७)

..................................प्रादेशिक नियोजन मंडळ.

..................................प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेचा मसुदा.

याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, वरील प्रादेशिक योजनेचा मसुदा तयार करण्यात आला असून कलम १६ मध्ये घालून दिलेल्या रीतीनुसार तो आता प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सर्वेक्षणे, विद्यमान जमीन वापर नकाशा आणि प्रादेशिक योजनेचा मसुदा लोकांना पहाण्यासाठी म्हणून मंडळाच्या ...........येथील प्रमुख कार्यालयात ........ते.............वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

---

१ "बारा" या शब्दाऐवजी हा शब्द दिनांक १ जून १९७३ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये दाखल करण्यात आला.

२ हा मजकूर दिनांक १० जुलै १९६९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये जादा दाखल करण्यात आला.

(x) ३) मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दि. ९ मार्च १९९७ च्या शा. अधिसूचनेद्वारे दाखल केला. (टीपीबी ४३९६/४३२३/प्र९१)

(xx) ४) नमुना 'अ' शासनाचे अधिसूचना दि २३-११-९३ अन्वये बदलून नव्याने दाखल

[1] [प्रादेशिक योजनेच्या मसुद्याच्या प्रती लोकांना पाहण्यासाठी पुढील ठिकाणीही [illegible]ल :—

(एक) ............ ते ................ वाजेपर्यंत ................

(स्थानिक प्राधिकरणाचे नाव)

(दोन) ............ ते ................ वाजेपर्यंत ................

(स्थानिक प्राधिकरणाचे नाव)

(तीन) ..................

(चार) ..................]

प्रादेशिक योजनेच्या मसुद्यासंबंधातील कोणत्याही हरकती किंवा सूचना, दिनांक ........१९... पूर्वी, मंडळाकडे पाठविता येतील आणि हरकती किंवा सूचना ज्या कारणावरून करण्यात आल्या असतील ती कारणे आणि प्रादेशिक नियोजन समितीने आपले प्रतिवृत्त मंडळाला सादर करण्यापूर्वी अर्जदाराला आपले म्हणणे प्रादेशिक नियोजन समितीपुढे मांडावयाची इच्छा आहे किंवा कसे या गोष्टी, अशा हरकतीत किंवा सूचनांमध्ये नमूद करण्यात येईल.

ठिकाण ........

दिनांक ........

सचिव,

प्रादेशिक नियोजन मंडळ.

## महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन मंडळे (वित्तव्यवस्था व लेखे) नियम, १९६७

शासकीय अधिसूचना, नगर विकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग, क्रमांक टीपीए-११६६-१०२-एकत्रीकरण-दोन, दिनांक २९ डिसेंबर १९६७ (महाराष्ट्र राजपत्र, १९६८, भाग चार व पृष्ठ ३९).

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) याच्या कलम १५८, पोट-कलम (२), खंड (बत्तीस), (तेहतीस), (चौत्तीस) व (पस्तीस) आणि कलमे १३०, १३१, १३२ आणि १३३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे ; हे नियम उक्त कलम १५८, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते —

### नियम

१. संक्षिप्त नाव.—या नियमांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन मंडळे (वित्त व्यवस्था व लेखे) नियम, १९६७ असे म्हणता येईल.

२. व्याख्या.—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत—

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) ;

(ब) "नमुना" म्हणजे या नियमांना जोडलेला नमुना,

(क) "कलम" म्हणजे या अधिनियमाचे कलम ;

(ड) या नियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात नेमून दिल्याप्रमाणे अनुक्रमे अर्थ असतील.

३. ठेवी कशा ठेवाव्यात.—मंडळ, किरकोळ खर्चाकरिता ५०० रुपयांची रक्कम स्वतःजवळ ठेवील व त्याच्या निधीतील ५०० रुपयांहून अधिक परंतु १०,००० रुपयांहून अधिक असणार नाही अशी रक्कम बँकेतर्फे कलम १३०, पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बँकेत, चालू खात्यामध्ये ठेवण्यात येईल.

[1] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दिनांक १० जुलै १९६९ च्या शासकीय अधिसूचनेअन्वये दाखल करण्यात आला.